महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

**महत्वाचे /तात्काळ/कालमर्यादित/ईमेलेव्दारे** जा. क्र. : तंशिविकापु/शै.वि.५/नियोजन /२०२३/ 5235

दिनांक : 8 NOV 2023

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय तंत्रनिकेतने

**विषय :-** **तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत शासकीय तंत्रनिकेतनामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता आवश्यक पायाभूत सोयि- सुविधा पुरविण्याकरिता संस्थेतील इमारती सुस्थितीत ठेवण्यासाठी (Facelifting) करण्याच्या अनुषंगाने अंदाजपत्रक सादर करणेबाबत.**

**संदर्भ :-** १. संचालनालयाचे पत्र क्र. ९/तंशिसं/नियोजान/२०२३/१९२ दि. ०५.०६.२०२३
२. शासनाचे पत्र क्र तंबानि-१०२३/प्र.क्र.११०/२३/तांशि-३, दि-२८.०८.२०२३
३. मा.मंत्री महोदय, उ. व त. शि. यांच्या कार्यालयाचे दि. ०६.१०.२०२३ रोजीचे पत्र
४. संचालनालयाचे पत्र क्र. ९(१)/तंशिसं/नियोजान/Facelifting/२०२३/३५८ दि. १२.१०.२०२३

उपरोक्त विषयास अनुसरुन शासकीय तंत्रनिकेतनातील प्रवेशित विद्यार्थ्यांना शिक्षणाकरिता पोषक वातावरण निर्मिती करण्याच्या अनुषंगाने संस्थेच्या परिसराचे सुशोभीकरण करुन अस्तित्वात असलेले बांधकाम सुस्थितीत ठेवणे आवश्यक आहे. प्रचलित कार्यपध्दतीनुसार, शासकीय इमारतींचे नवीन बांधकामे तसेच दुरुस्त्या इत्यादींच्या अंदाजपत्रक सा.बा. विभागाकडून अंदाजपत्रक तयार करण्यात येवून त्यास शासनाची प्रशासकीय मान्यता घेण्यात येते. तथापि, या कार्यपध्दतीनुसार सर्व शासकीय तंत्रनिकेतनांचे तयार केलेले अंदाजपत्रक समान निकषावर आधारित प्राप्त होत नाही.

त्याकरिता मा. मंत्री महोदय, उ. व. तं. शि. विभाग यांनी दिलेल्या निर्देशानुसार शासकीय तंत्रनिकेतनाचे विविध बांधकामांचे दुरुस्त्या करुन Facelifting करण्याबाबतचा प्रस्ताव संचालनालयाच्या संदर्भीय क्र. १ च्या पत्रान्वये शासनास सादर केलेला होता.

१. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने संदर्भीय क्र. २ च्या पत्रान्वये निर्देश दिले आहे की, याकरीता योग्य तो समन्वय व प्रशासकीय सोय विचारात घेता मुंबईस्थित व्हि.जे.टी.आय., मुंबई या संस्थेमार्फत तातडीने DPR तयार करुन घ्यावा.

२. याअनुषंगाने ११.१०.२०२३ रोजी, व्हि.जे.टी.आय., मुंबई येथे सर्व शासकीय तंत्रनिकेतनातील स्थापत्य किंवा अनुषंगिक शाखेचे विभागप्रमूख व एक अधिव्याख्याता यांच्याकरीता कार्यशाळा यांच्याकरीता कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती. सदर कार्यशाळेमध्ये विषयांकित DPR तयार करण्याकरिता आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले आहे.

**कृ.मा.प.**

३. याच पार्श्वभूमीवर, मा. मंत्री महोदय, उ. व त. शि. यांच्या कार्यालयाच्या संदर्भीय क्र. ३ च्या पत्रान्वये, शासकीय तंत्रनिकेतनांमधील इमारतीचे आवश्यक दुरुस्तीचे खर्चासह अंदाजपत्रक सादर करण्याची कार्यवाही करण्याबाबत, मा. सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग (बांधकाम), मंत्रालय मुंबई, यांना कळविण्यात आले आहे.

४. परिच्छेद क्र. ३ मध्ये नमुद केलेल्या कार्यशाळेमध्ये सुचित केल्याप्रमाणे आपल्या संस्थेतील विविध बांधकामांची पाहणी करुन आवश्यकतेनुसार खालील बाबींचे DPR/अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. या विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय तंत्रनिकेतनाच्या संस्थाप्रमूखांना सूचित करण्यात येते की, सदर DPR/अंदाजपत्रकास शासनाची प्रशासकीय मान्यता घेणे क्रमप्राप्त असुन, सदर अंदाजपत्रक आपल्या क्षेत्रातील संबंधित सा.बा. विभागाच्या, दि. ०५.०९.२०१९ च्या शासन परिपत्रकानुसार सा.बा. विभागाच्या सक्षम अधिकाऱ्याची तांत्रिक सहमती प्राप्त करुन त्यास संबंधित मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांची शिफारस प्राप्त करुन अंदाजपत्रक स्वरुपात संचालनालयास दि. २४.११.२०२३ रोजी पर्यंत सादर करण्यात यावे.

सोबत : संदर्भीय पत्र.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४२९/४९०,
ई-मेल-desk9@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक: ९(१)/तंशिसं/ नियोजन/Facelifting/२०२३/३५८ — दि-०७.११.२०२३

**महत्वाचे/तात्काळ/कालमर्यादित**

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय तंत्रनिकेतने

विषयः तंत्रशिक्षण संचालनालच्या अंतर्गत शासकीय तंत्रनिकेतनामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता आवश्यक पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्याकरिता संस्थेतील इमारती सुस्थितीत ठेवण्यासाठी (Facelifting) करण्याच्या अनुषंगाने अंदाजपत्रक सादर करणेबाबत..

संदर्भः- १.संचालनालयाचे पत्र क्र. ९/ तंशिस/नियोजन/ २०२३/१९२, दि-०५.०६.२०२३.
२. शासनाचे पत्र क्र. तंबानि-१०२३/प्र.क्र.११०/२३/तांशि-३, दि-२८.०८.२०२३.
३. मा. मंत्री महोदय,उ.व त. शि., यांच्या कार्यालयाचे दि-०६.१०.२०२३ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन शासकीय तंत्रनिकेतनातील प्रवेशित विद्यार्थ्यांना शिक्षणाकरिता पोषक वातावरण निर्मिती करण्याच्या अनुषंगाने संस्थेच्या परिसराचे सुशोभिकरण करुन अस्तित्वात असलेले बांधकाम सुस्थितीत ठेवणे आवश्यक आहे. प्रचलित कार्यपध्द्तीनुसार, शासकीय इमारतींचे नवीन बांधकामे तसेच दुरुस्त्या इत्यादींच्या अंदाजपत्रक सा.बा. विभागाकडून अंदाजपत्रक तयार करण्यात येवून त्यास शासनाची प्रशासकीय मान्यता घेण्यात येते. तथापि, या कार्यपध्दतीनुसार सर्व शासकीय तंत्रनिकेतनांचे तयार केलेले अंदाजपत्रक समान निकषावर आधारित प्राप्त होत नाही.

त्याकरिता मा. मंत्री महोदय, उ.व.तं.शि. विभाग यांनी दिलेल्या निर्देशानुसार शासकीय तंत्रनिकेतनांचे विविध बांधकामांचे दुरुस्त्या करुन Facelifting करण्याबाबतचा प्रस्ताव संचालनालयाच्या संदर्भिय क्र. १ च्या पत्रान्वये शासनास सादर केलेला होता.

२. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने संदर्भिय क्र. २ च्या पत्रान्वये निर्देश दिले आहे की, याकरिता योग्य तो समन्वय साधणे व प्रशासकीय सोय विचारात घेता मुंबईस्थित व्ही.जे.टी. आय, मुंबई या संस्थेमार्फत तातडीने DPR तयार करुन घ्यावा.

३.	यानुषंगाने, दि. ११.१०.२०२३ रोजी, व्ही.जे.टी.आय., मुंबई येथे सर्व शासकीय तंत्रनिकेतनांतील स्थापत्य किंवा अनुषंगिक शाखेचे विभागप्रमुख व एक अधिव्याख्यात्या यांच्याकरिता कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती. सदर कार्यशाळेमध्ये विषयांकित DPR/ अंदाजपत्रक तयार करण्याकरिता आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले आहे.

४.	याच पार्श्वभूमीवर, मा. मंत्री महोदय, उ.व त.शि. यांच्या कार्यालयाच्या संदर्भिय क्र. ३ च्या पत्रान्वये, शासकीय तंत्रनिकेतनांमधील इमारतीचे आवश्यक दुरुस्तीचे खर्चासह अंदाजपत्रक सादर करण्याची कार्यवाही करण्याबाबत, मा. सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग (बांधकाम), मंत्रालय मुंबई, यांना कळविण्यात आले आहे.

४.	परिच्छेद क्र. ३ मध्ये नमुद केलेल्या कार्यशाळेमध्ये सुचित केल्याप्रमाणे आपल्या संस्थेतील विविध बांधकामांची पाहणी करुन आवश्यकतेनुसार DPR/ अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. सदर DPR/अंदाजपत्रकास शासनाची प्रशासकीय मान्यता घेणे क्रमप्राप्त असुन, सदर अंदाजपत्रक आपल्या क्षेत्रातील संबंधित सा.बा. विभागास उपलब्ध करुन देण्यात यावा. तसेच, सा.बा. विभागाच्या, दि-०५.०९.२०१९ च्या शासन परिपत्रकानुसार सा.बा. विभागाच्या सक्षम अधिका-याची तांत्रिक सहमती प्राप्त करुन त्यास संबंधित मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांची शिफ़ारस प्राप्त करुन **अंदाजपत्रक स्वरुपात संचालनालयास दि.-२४.११.२०२३ पर्यंत सादर करण्यात यावेत.**

(डॉ.विनोद म. मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा., मुंबई.

प्रत माहिती करिता सादर-

१. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई.
२. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग (बांधकाम), मंत्रालय मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता-

१. सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये.
२. सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग.

जा. क्र./मंत्री/उ.व तंत्र शि., वस्त्रो.सं.कार्य/टिप्पणी/११५४/२०२३


**मंत्री**

**उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग**

**आणि संसदीय कार्य**

यांचे कार्यालय

महाराष्ट्र शासन

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

*cbpatil.minister@gmail.com*


दिनांक : 0 6 OCT 2023

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिनस्त प्रत्येक जिल्ह्यामध्ये शासकीय अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन तसेच उच्च शिक्षणाचे महाविद्यालये व विद्यार्थ्यांची वसतीगृहे अस्तित्वात आहे. सदर महाविद्यालयांच्या तसेच वसतीगृहांच्या दुरावस्था, सुरक्षिततेबाबत व अपुऱ्या सोईसुविधाबाबत मा. मंत्री महोदयांकडे अनेक लोकप्रतिनिधी तसेच विद्यार्थी व पालकांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत.

विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असतांना सुरक्षित इमारत तसेच आवश्यक असे पोषक वातावरण, आरोग्यदायी स्वच्छतागृहे व अन्य मुलभूत सोईसुविधांसह उपलब्ध व्हाव्यात याअनुषंगाने जिल्हानिहाय उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिनस्त सर्व शासकीय महाविद्यालयांची आपल्या स्तरावर तपासणी करण्यात यावी तसेच आवश्यक असल्यास स्ट्रक्चरल ऑडीट करावे व केलेल्या तपासणीचा अहवाल दुरूस्ती खर्चाच्या अंदाजपत्रकासह शासनास तात्काळ सादर करण्यात यावा, अशी मा. मंत्री महोदयांचे निदेशानुसार विनंती आहे.

(अतुल खानोलकर)

खाजगी सचिव

प्रति,

**मा. सचिव, (बांधकाम)**

सार्वजनिक बांधकाम विभाग,

मंत्रालय, मुंबई.

प्रति,

**मा.प्रधानसचिव,**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,

मंत्रालय, मुंबई.

प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

१. मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे

२. मा. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई

**रु. १५ कोटी पेक्षा कमी किंमतीच्या इमारतींच्या कामांना उपभोक्ता विभागामार्फत प्रशासकिय मान्यता प्रदानकरण्याकरीता क्षेत्रिय मुख्य अभियंता यांनी तांत्रिक सहमती देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन परिपत्रक, क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र. १० /इमा-२**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २५ सप्टेंबर, २०१९

**संदर्भ :** १) वित्त विभागाचा शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/ २०१३/विनियम, भाग-२, दि. १७ एप्रील २०१५.
२) वित्त विभागाचा शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/ २०१३/विनियम, भाग-२, दि. २० सप्टेंबर, २०१९.

**प्रस्तावना :-**

वित्त विभागाच्या संदर्भ १ च्या शासन निर्णयान्वये परिच्छेद १३४ (१), (२), (३) अन्वये रू.२० लक्ष पेक्षा जास्त रकमेचे सर्व प्रस्ताव तांत्रीक सहमतीसाठी सा.बां. विभागाकडे प्राप्त होतात.

२. तथापि, इमारतीच्या बाबनिहाय सखोल व सविस्तर अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता देण्याचे वरील प्रमाणे अमर्याद अधिकार प्रादेशिक मुख्य अभियंता यांना असल्याने, केवळ जोतादराच्या आधारे प्रशासकिय मान्यता करीता ढोबळ अंदाजपत्रकांना तांत्रिक सहमती दर्शविण्याची जबाबदारी पार पाडण्यास, क्षेत्रिय मुख्य अभियंता हे निश्चितपणे सक्षम असल्यामुळे वित्तीय अधीकारात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती व त्यानुसार वित्त विभागाने संदर्भ २ वरील शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. ( संदर्भीय शासन निर्णयाची प्रत महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे )

**शासन परिपत्रक**

३. उपरोक्त संदर्भाधिन २ च्या शासन निर्णयान्वये यापुढे बांधकामाचे अंदाजपत्रक तांत्रिक सहमतीसाठी मंत्रालयीन सा. बां. विभागाकडे सादर करतांना सुधारीत तरतुदी नुसार खालील प्रमाणे निर्देशांची अंमलबजावणी करण्यात यावी.

४. रू. १५ कोटी पेक्षा कमी किंमत असलेल्या अंदाजपत्रकीय रकमेच्या कामांना क्षेत्रीय स्तरावरील मुख्य अभियंता (स्थापत्य) व मुख्य अभियंता (विद्युत) हे सर्वोच्च क्षेत्रिय तांत्रीक अधिकारी असून तांत्रीक मान्यता प्रदान करणा-या सक्षम अधिका-याने ढोबळ अंदाजपत्रकास तांत्रीक सहमती (Technical Approval) प्रदान केल्यानंतर संबंधीत **मुख्य अभियंता यांच्या कडून शिफारसीसह** प्राप्त अंदाजपत्रकानुसार उपभोक्ता विभाग त्यांच्या कडील कामाची निकड व अनुदानाच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही करतील.

५. मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षते खालील उच्चाधिकार समितीमध्ये छाननी करण्यात येणाऱ्या रू. १५ कोटी पेक्षा जास्त किंमत असलेल्या इमारतींच्या कामांना मंत्रालय स्तरावरून सा. बां. विभागामार्फत तांत्रिक सहमती दिल्या नंतर उपभोक्ता विभाग त्यांच्या कडील कामाची निकड व अनुदानाच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही करतील.

६. अंदाजपत्रक तयार करतांना एका प्रकल्पासाठी आवश्यक सर्व बाबींसाठी एकच अंदाजपत्रक तयार करण्यात यावे, कोणत्याही परिस्थीतीत कामाचे तुकडे पाडण्यात येऊ नयेत.

७. कामाचे ढोबळ अंदाजपत्रक तयार करतांना शासनाने विहीत केलेल्या सोबत जोडलेल्या Recapitulation Sheet चा वापर करण्यात यावा.

८. **सर्वच सुधारीत अंदाजपत्रकांच्या बाबतीत सा. बां. विभागाची पूर्व सहमती घेण्यात यावी.**

९. उपभोक्ता विभागाने एखादया कामासाठी सा. बां. विभागाकडे अंदाजपत्रकाची मागणी करतांना सदर कामासाठी **आवश्यक अनुदान** उपलब्ध होऊ शकेल अशा आशयाचे सक्षम प्राधिका-याचे पत्र तसेच बांधकामासाठी **आवश्यक जागा** ताब्यात असल्याबाबत चे कागद पत्र उपभोक्ता विभागाकडून उपलब्ध करुन घेतल्यानंतर अंदाजपत्रक देण्यात यावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०९२५१७०८०३५६१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

Salunke Bapurao Popatrao

Digitally signed by Salunke Bapurao Popatrao
DN: CN = Salunke Bapurao Popatrao, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Works Department
Date: 2019.09.25 17:10:27 +05'30'

**(बी. पी. साळुंके)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा.राज्यमंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
४) मंत्रालयीन सर्व विभागातील अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
५) महालेखापाल-१, मुंबई
६) महालेखापाल-२, नागपूर
७) अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई/नागपूर